महामंडलेश्वर

स्वामी परमानंदगिरीजी महाराजांचे

**सत्संग - प्रवचन**

# नित्यकर्म - अनुष्ठान महिमा



***(प्रथम आवृत्ती)***

- प्रकाशक -

ॐ परमानंद प्रकाशन

**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज आश्रम**

भांगसीमाता गड, परमानंदनगर, शरणापूर, औरंगाबाद (महाराष्ट्र)

दूरध्वनी :

किंमत : दहा रुपये (१०/-)

## निवेदन

जीव रात्रंदिवस कर्म करतो. एक क्षणभर देखील जीव कर्म केल्या शिवाय राहत नाही. कायीक, वाचिक, मानसिक अशा त्रिविध प्रकारे तो कर्म करत असतो.

जो जसे कर्म करत असेल त्याप्रमाणे उत्तम, मध्यम व अधम फळ मिळून जीव उत्तम, मध्यम व अधम गतीला जातो.

विशेष करून जीवाने अधम किंवा निच कर्माचा म्हणजेच तमोगुणी कर्माचा त्याग करून चांगले कर्म सत्कर्म म्हणजेच सत्त्वगुणीकर्म करून उत्तम गती प्राप्त करून घेतली पाहिजे.

जीवाची सद्‌गती व्हावी यासाठी **श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज** नेहमी सदुपदेश करत असतात. एवंढेच नव्हे तर अनेकांकडून सत्कर्म करून घेत असतात.

जे सत्कर्म प्रत्येक जीवाने फळाची अपेक्षा न ठेवता केले पाहिजे असे सत्कर्म ज्या प्रवचनात विशेष करून सांगितलेले आहे. ते आपण समजून घेतले पाहिजे. व देहाचे सार्थक केले पाहिजे. यासाठी हे सत्संग-प्रवचन पुस्तक रुपाने आपल्या हातात देत आहे.

**प्रकाशक**

**स्नान संध्या जप नित्य अनुष्ठान । करी सावधान आत्मनिष्ठे ।।१।।**
**फलाशा सोडूनी न अहं कर्तव्यता । मोक्ष तो आइता तेथे असे ।।२।।**
**स्वधर्माचरन आपुलाले वर्ण । यज्ञ आणि दान करी सर्व ।।३।।**
**बहेणी म्हणे ऐसा साधिल तो जरी । सत्त्व तो अंतरी प्रवेशेल ।।४।।**

◆ ◆ ◆ ◆ ◆

या अभंगाचे उच्चारण करण्यापूर्वी कबीर महाराजांच्या दोह्यांच उच्चारन केले होते. जसे ...

**एक शब्द सुख खानी है एक शब्द दुःख रासी ।**
**एक शब्द बंधन कटे एक शब्द गल फासी ।।**

या जगात असे काही शब्द असतात ज्या शब्दांमुळे सुखाची खान ही खान प्राप्त होते. तसेच काही असेही शब्द असतात की जे उच्चारल्यानंतर दुःखाची रासही रास प्राप्त होते. तसेच काही शब्द असेही असतात की, त्या शब्दामुळे जन्ममरणाचा काळाच, यमाचं बंधन तुटूनं जातं तर काही असेही शब्द असतात की काळाचा यमाचा फास गळयाला लागतो व जीव चौऱ्यांशीच्या फेऱ्यात भ्रमण करत राहतो. अशा प्रकारे शब्दांचा प्रभाव व्यवहारात देखील प्रत्यक्ष दिसतो की, न होणारे काम चांगले शब्द उच्चारल्या नंतर सहज होतात. व अपमानवाचक, शिवीवाचक शब्द उच्चारल्याने सहज होणारे काम देखील होत नाही. म्हणून म्हणतात...

**शब्द बराबर धन नही ज्यो कोई ज्याने मोल ।**
**हिरा तो दामो मिले शब्द न मोल न तोल ।।**

या जगात सर्वात अमूल्य काय असेल तर तो शब्द आहे. काहीजण हिऱ्याला सर्वात मूल्यवान मानतात, परंतु हिऱ्याचे वजन



होऊ शकते हिऱ्याची किंमत होऊ शकते परंतु शब्दाचे मोल तोल होऊ शकत नाही म्हणून शब्द अमूल्य असतो.

अशा प्रकारे शब्दांचा महिमा अनमोल असला तरी त्या शब्दाचे महत्त्व सर्वच जानतात असेही नाही. जसे कबीर महाराज म्हणतात...

**कबीर लहरी समुद्र की मोती बिखरे आय ।**
**बगुला परख न जानही हंसा चुनी चुनी खाय ।।**

सत्संग रूपी समुद्रामधून शब्दरूपी मोती बाहेर येत असतात. परंतु ढोंगी बगळा त्या शब्दरूपी मोत्याला जाणत नाही. त्याचे ध्यान क्षणभंगूर विषय किंवा व्यसनाकडे लागलेले असते. परंतु विवेकी हंस किंवा परमहंस ज्यांना चांगले-वाईट, पाप-पुण्य, धर्म-अधर्म याचे ज्ञान आहे, असे विवेकी संत, भक्त, मुमुक्षू, साधक शब्दरूपी मोती ग्रहण करतात व आपल्या जीवनाचे सार्थक करून घेतात.

आतापर्यंत अनेक संत, भक्त, मुमुक्षू, साधक-शिष्य रात्रीच्या अंधकारमय वातावरणात या सत्संग-प्रवचन रूपी समुद्राजवळ येऊन शब्दरूपी मोती ग्रहण करत होते. आज अनुष्ठानाचा आठवा म्हणजे शेवटचा समाप्तीचा दिवस आहे. आज जास्त प्रवचन करण्याची आवश्यकता नाही. आज प्रसाद घेऊन आपणास आपापल्या गावी जायचे आहे. आतापर्यंत आपन अनुष्ठानाच्या निमित्ताने पंधरा प्रवचने ऐकलेले आहे. असे असले तरी कदाचीत काही असेही भक्त साधक असतील की, ते आजच सत्संग प्रवचनाला आले असतील तर त्यांना देखील लाभ व्हावा. यासाठी थोडक्यात

प्रवचन होईल. प्रवचन थोडक्यात होणार असले तरी जसे आत्ताच सांगितले की '' एक शब्द सुख खानी है '' किंवा '' एक शब्द बंधन कटे '' एखादा असा शब्द असतो की ज्याने सुखाची खाण ही खाण प्राप्त होते व असेही शब्द असतात ज्याने जन्म मृत्यूचे बंधन कटून जाते. म्हणून असे महान प्रभावकारी शब्द ज्या अभंगामध्ये आलेले आहे ते आपण लक्षपूर्वक श्रवण करून त्याचे मनन करून निदध्यास जर या अभंगातील शब्दांचा घेतला तर आपणास तर सुख मिळेलच मिळेल. परंतु आपल्या सानिध्यात जे येतील त्यांनी देखिल आपल्या सारखे या शब्दांचे व्यवहारात पालन केले तर ते देखील तरून जातील.

संत बहेणाबाईचा हा जो चार चरणाचा अभंग आहे त्याच्या पहिल्या दोन चरणामध्ये मुक्त होण्याचा उपाय सांगितलेला आहे. आपण मुक्त नाहीच होऊ शकलो तर कमीत कमी आपली अधोगती होऊ नये यासाठी दुसऱ्या दोन चरणात अधोगतीपासून वाचण्याचा उपाय सांगितलेला आहे. तसा तर संत बहेणाबाईचा या अभंगाद्वारे उपदेश करण्याचा मुख्य उद्देश हा आहे की, आपण जन्म मृत्यूच्या चक्रापासून, काळाच्या भयापासून, यमाच्या त्रासापासून मुक्त झाले पाहिजे. अशा प्रकारे मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे. हे ती संत माऊली पहिल्या दोन चरणामध्ये सांगते की...

**स्नान संध्या जप नित्य अनुष्ठान । करी सावधान आत्म निष्ठे ।।**
**फलाशा सोडूनी न अहंम कर्तव्यता । मोक्ष तो आइता तेथे असे ।।**

थोडक्यात की जो स्नान, संध्या, जप नित्य अनुष्ठान करतो कसल्याही फळाची अपेक्षा करीत नाही. परंतु कर्तव्य कर्म मात्र करतो.



आणि मी करतो, असा अहंकार मनात येऊ देत नाही ''तूच करता आणि तूच करविता शरण तुला रे भगवंता'' अशा भावनेने जो कर्म करतो, तो जन्म मृत्यूच्या चक्रापासून मुक्त होतो.

म्हणून आपणास जन्म मृत्यूच्या चक्रापासून, काळाच्या भयापासून, यमाच्या त्रासापासून मुक्त व्हायचे असेल, तर त्यासाठी तसेच दुःखापासून, अज्ञानापासून मुक्त व्हायचे असेल, तर त्यासाठी या दोन चरणांचा अल्पसाका होईना शब्दशा अर्थ समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. या दोन चरणामध्ये मुक्त ज होण्यासाठी जे सहा उपाय सांगितले त्या पैकी पहिला उपाय म्हणजे

**स्नान :-**

दररोज स्नान केलेच पाहिजे. जल स्नान, मंत्र स्नान, भस्म स्नान, वायू स्नान असे बरेच स्नानाचे प्रकार आहे.

**जलस्नानः-**

जल स्नान म्हणजे पाण्याने नित्य स्नान करणे. दररोज न चुकता स्वच्छ, शुद्ध, पवित्र पाण्याने स्नान केलेच पाहिजे. कारण आपणास माहिती असेलच की, आपण काहीही कार्य केले नाही केवळ झोप घेतली तरी शरीराला घाम येतो. त्वचेवर घाम साचतो. शरीराचा दुर्गंध येतो. मळामध्ये किती तरी जंतू असतात जे सामान्य डोळ्यांनी दिसत नाही असे तयार होतात. त्यामुळे नेहमी व्यक्ती आजारी राहतो. काही तर सामान्य डोळ्यांना देखील दिसतात जश्या उवाः बऱ्याचशा स्त्रिया डोक्यातील उवा मारत राहतात, धरत राहतात. कपड्यामध्ये देखील उवा तयार होतात. त्या उवा कशा तयार होतात? तर घामामुळे. कारण त्यांची उत्पत्ती स्वेदज आहे.

स्वेदज म्हणजे घामापासून उत्पन्न होणारे जीव. अशा केवळ उवांच तयार होतात असे नव्हे, तर कितीतरी जंतू घामापासून तयार होतात. त्यामुळे आजारी पडण्याची शक्यता असते. म्हणून डॉक्टरकडे वैद्याकडे जो पैसा व वेळ खर्च करतो. त्यापेक्षा थोडा वेळ व पैसा स्नानासाठी, पाण्यासाठी खर्च केला तर आपण निरोगी राहू शकतो म्हणून नित्य जलाने म्हणजेच पाण्याने स्नान केले पाहिजे.

**मंत्रस्नान :-**

जलस्नानाने शरीराची शुद्धी होते. परंतु मनाची शुद्धी होईलच असे नाही. मनाची शुद्धी होण्यासाठी सद्‌गुरु मुखाने मंत्र घेऊन त्याचा नित्य जप केला पाहिजे किंवा जे वैदिक मंत्र असेल त्या मंत्राचा उच्चार केला पाहिजे.

**भस्मस्नान :-**

भस्मस्नान म्हणजे बरेच भक्त हाताला, दंडाला, कपाळाला भस्म लावतात व शेवटी सर्व अंगावरून भस्माचा हात फिरवतात. याचा अर्थ काय? तर याचा अर्थ हा की, हे सर्व भस्म होणार आहे. मातीत मिळून जाणार आहे. हे सर्व शरीर जर भस्म होणार आहे तर या शरीरासाठी एवढे पाप कशासाठी करायचे? असा प्रश्न मनात निर्माण होऊन भस्म होणाऱ्या नाश पावणाऱ्या शरीरासाठी पाप कमी होऊन बुद्धी शुद्ध होते. भस्म स्नानाने चांगले-वाईट, पाप-पुण्य, शाश्वत-अशाश्वत याचा बोध होऊन विवेकाने बुद्धीची शुद्धता होते.

**वायुस्नान :-**

ब्रह्ममुहूर्तामध्ये हवा एकदम शुद्ध असते. प्रदुषन रहित असते. अशा ब्रह्ममुहूर्तात गावाच्या बाहेर एकांतात एखादे मंदिर असेल,



कुटीया असेल अशा ठिकाणी जात असेल, तर अशा वेळेस ब्रह्ममुहूर्तातील जी हवा म्हणजेच वायू अंगाला लागतो त्याने अनेक प्रकारचे रोग निवृत्त होतात. म्हणून वायूस्नान केले पाहिजे.

या व्यतिरिक्त ब्रह्मस्नान किंवा ऋषीस्नान, देवतास्नान, आसुरीस्नान असेही अनेक स्नानाचे प्रकार आहे.

**ब्रह्मस्नान :-**

ब्रह्मस्नान किंवा ऋषीस्नान म्हणजे ज्या वेळेस ब्रम्हनाडी जागृत असते अशा वेळेस स्नान करणे. साधारणतः सकाळी तीन-चार वाजेच्या दरम्यान ब्रह्मनाडी जागृत असते, चालू असते. अशा वेळेस किंवा जोपर्यंत तारे लोप पावलेले नाही तोपर्यंत स्नान करून ब्रह्मचिंतन केल्याने तो साधक ब्रह्मलोकाला जातो.

**देवतास्नान :-**

तारे लोप पावले. आता आकाशात तारे दिसत नाही. परंतु अजून सूर्य उगवलेला नाही. अशा वेळेस जे स्नान केल्या जाते. त्याला देवता स्नान म्हणतात. असे देवता स्नान करणारे साधक भक्त देवता लोकात म्हणजे स्वर्गामध्ये जातात.

**असुरीस्नान :-**

जे लोक सूर्य उगवल्यानंतर स्नान करतात, त्याला आसुरी स्नान किंवा राक्षसी स्नान म्हणतात. असा जीवात्मा मृत्यूनंतर असूर म्हणजेच राक्षस होतो व जे सूर्य उदयानंतरही स्नान करत नाही. अशा जीवांची महान दुर्गती होते. असे ज्ञानी म्हणतात. म्हणून संत बहेणाबाई म्हणते, आपला प्राण गेला तरी काही हरकत नाही. परंतु आत्मनिष्ठेने दररोज आपन स्नान केले पाहिजे.

ज्याप्रमाणे स्नान नित्य केले पाहिजे. त्याच प्रमाणे नित्य संध्या केली पाहिजे. त्रिकाल मंत्रयुक्त संध्या नाहीच करता आली तर कमीत कमी प्रातःसंध्या जरूर केलीच पाहिजे. संध्याचे मंत्र म्हणता आले नाही तर कमीत-कमी सूर्योदयाच्या वेळेस गुरूचा भगवंताचा फोटो प्रतिमा असेल त्या समोर बसून गुरुमंत्राचा म्हणजेच गुरुने दिलेल्या मंत्राचा जप, ध्यान, प्राणायाम केला पाहिजे.

सुरूवातीला नित्यनियमाने व विशिष्ठ संख्येने गुरुमंत्राचा म्हणजेच गुरुने दिलेल्या मंत्राचा ध्यानयुक्त जप केला पाहिजे. विशिष्ठ आसनावर बसून विशिष्ठ माळीवर मंत्र जप केला पाहिजे व त्या नंतर चालताबोलता सर्व कार्य करता मानसिक जप केला पाहिजे.

त्या नंतर चौथी गोष्ट म्हणज...

**अनुष्ठान** नित्य केले पाहिजे. नित्य अनुष्ठान कसे करावयाचे हे जानण्यासाठी सद्‌गुरुच्या सानिध्यात जरूर एक तरी नैमित्तिक अनुष्ठान केले पाहिजे.

अनादी काळापासून ऋषी-मुनी, साधू-संत, महात्मे अनुष्ठान करत आलेले आहे. वाल्हया कोळयाने अनुष्ठान केले व वाल्ह्याचा वाल्मीक ऋषी झाला. हे तर सर्वांना माहीतच आहे.

अनुष्ठानाचा काय महिमा आहे. हे जानण्यासाठी अनुष्ठानाने जीवाची मुक्ती हे पुस्तक जरूर वाचले पाहिजे. स्वतः एक तरी सद्‌गुरुच्या सानिध्यात अनुष्ठान केले पाहिजे.

अनुष्ठान महिमा कळण्यासाठी संत महात्मे एक घडलेली घटना सांगतात...

संत मीराबाईचा शौचालय साफ करण्यासाठी एक भंगीन



नित्य जायची व शौचालय साफ करायची. एक दिवस काही कामामुळे ती जाऊ शकली नाही. त्यामुळे तिने आपल्या तरूण मुलाला तो शौचालय साफ करण्यासाठी पाठविले. तो भंग्याचा मुलगा ज्या वेळेस शौचालय साफ करण्यासाठी गेला नेमक्या त्याच वेळेस मीराबाई शौचालयमधून बाहेर आली. राजकुमारी मीराबाईचे ते सौदर्य त्या भंग्याच्या मुलाने बघितले. घरी येऊन झोपून राहीला. आईने त्याला विचारले, परंतु तो काहीच बोलेना. तेव्हा ती भंगीन म्हणाली, तुला काय झाले? तुला काय हवे आहे? त्या वेळेस त्या मुलाने घडलेली घटना सांगितली, मीराबाई खूपच सुंदर आहे, मला तिच्याशी लग्न करण्याची इच्छा आहे.

हे ऐकून ती भंगीन तर थक्कच झाली! ती म्हणाली हळू बोल कारण कुणी ऐकले तर मीराबाई तर मिळणार नाही. परंतु तुला व मलाही सुळावर चढवतील. कारण आपण भंगी शौचालय साफ करून पोट भरतो व मीराबाई राजकन्या आहे. तेव्हा हे सर्व कसे शक्य आहे? परंतु त्या मुलाने तर मीराबाईशी लग्न करण्याचा हट्टच धरला. अन्न पाणी घेणे सर्व बंद केले. त्यामुळे ती भंगीन म्हणाली मी काहीतरी उपाय करते.

दुसऱ्या दिवशी ती भंगीन उठली व तिने मंदिरात जे पुजेचे साहित्य नेतात ते सर्व सोबत घेतले व शौचालय साफ करण्यासाठी गेली. शौचालय साफ केला, तेथे सारवून घेतले. रांगोळया काढल्या अगरबत्त्या लावल्या. शौचालयाजवळ फुले वाहिली व घरी आली. भगवंताच्या मूर्तीसमोर जे करतात ते सर्व तिने त्या शौचालयजवळ केले. या प्रमाणे एक दोन दिवस झाल्यानंतर मीराबाई त्या भंगीनीला

म्हणाली की, बाई हे सर्व मंदिरात करावयाचे असते. हे सर्व जर तू मंदिरात केले असते तर भगवंत प्रसन्न झाला असता. हे ऐकून भंगीन म्हणाली की, मीराबाई! मला भगवंताकडे काहीही मागायचे नाही. त्यामुळे मंदिरात हे सर्व करून काय उपयोग? मला तुमच्याकडे काही मागायचे आहे, सांगायचे आहे, म्हणून मी हे सर्व येथे केले. तेव्हा मीराबाई म्हणाली ठीक आहे. मला काय मागायचे आहे किंवा काय सांगायचे आहे, ते सांग. तेव्हा परत भंगीन म्हणाली की, मला जे मागायचे आहे किंवा सांगायचे आहे ते ऐकल्यानंतर आपण मला ते देणार तर नाही. परंतु मला तुम्ही सुळावर चढवाल. तेव्हा परत मीराबाई म्हणाली, मला नाही देता आलं तर देणार नाही. परंतु मी तुला वचन देते की, तुला सुळावर तर निश्चितच चढविणार नाही. हे ऐकल्यानंतर त्या भंगीनीने घडलेला प्रकार मीराबाईला सांगितला व हेही सांगितले की माझ्या मुलाने आपल्याशी लग्न करण्याचा हट्ट धरलेला आहे व त्याने अन्न पाण्याचा देखील त्याग केलेला आहे.

हे ऐकल्यानंतर मीराबाई देखील क्षणभर स्तब्ध झाली. परंतु मीराबाई भक्त होती त्यामुळे ती थोडी अंतर्मुख झाली व नंतर लगेच म्हणाली की, आपल्या मुलाला माझ्याकडे पाठवून द्या. हे ऐकून भंगीन आनंदाने घरी आली व मीराबाईने तुला बोलविले, असे आपल्या मुलाला सांगितले. मात्र मनात म्हणाली लग्न करण्यासाठी बोलविले की, सुळावर देण्यासाठी बोलाविले हे तर परमात्माच जाणो.

मीराबाईने बोलविले हे ऐकून मोठ्या आनंदाने मुलगा मीराबाईकडे गेला. मीराबाईने त्या मुलाला विचारले, आपली काय इच्छा आहे? त्या वेळेस तो थोडा भीत भीतच म्हणाला की, आपल्या



हातून माळ (फुलाचीमाळ) घालण्याची इच्छा आहे. म्हणजेच आपल्याशी लग्न करण्याची इच्छा आहे. तेव्हा मीराबाई म्हणाली की, त्यासाठी मी जे सांगेल ते सर्व तुम्हाला करावे लागेल. तो मुलगा म्हणाला की, मी आपण सांगाल त्या प्रमाणे करायला वागायला तयार आहे.

त्या नंतर मीराबाईने त्या भंग्याच्या मुलाला एकांत खोलीमध्ये नेले. तिथे त्याला बसण्यास सांगितले आणि समोर भगवंताचा एक फोटो ठेवून दिला. त्यानंतर त्याला सांगितले की, सात दिवस आपली दृष्टी केवळ फोटोकडे पाहिजे, अशी एक सारखी दृष्टी आपली फोटोकडे सात दिवस राहिली तर आठव्या दिवशी मी आपणास माळ घालेन. परंतु त्यापूर्वी जर का आपली दृष्टी इकडे तिकडे गेली तर दोन्ही बाजूला नंग्या तलवारी घेऊन उभे असलेले सैनिक तुझे मस्तक धडा वेगळे करतील. ही शर्त त्या मुलाने मान्य केली.

त्या नंतर तो मुलगा फोटोकडे एक सारखे बघत राहिला. तो दिवस गेला, दुसरा गेला, तिसरा गेला त्या नंतर तर त्याने डोळे बंद केले. खाणे, पिणे झोपणे कसलंच भान नाही. सात दिवस कसे निघून गेले कळलेच नाही. आठवा दिवस उजाडला तेव्हा मीराबाईने त्या मुलाचा समाचार विचारला तेव्हा सैनिकाने सांगितले की, सात दिवसापासून तो स्तब्ध बसलेला आहे. हे ऐकल्यानंतर मीराबाईने फुलाची माळ घेतली व त्या खोलीत गेली ज्या खोलीत तो भंग्याचा मुलगा शांत बसलेला होता. मीराबाईने सेवकाला सांगून त्याला हलवायला सांगितले. सेवकाच्या स्पर्शाने त्या मुलाचे

ध्यान भंग पावले. त्याने डोळे उघडून बघितले की, समोर मीराबाई फुलांचा हार घेऊन उभी आहे. हे बघितल्यानंतर त्याच क्षणी तो उठला आणि त्याने मीराबाईच्या हातातील फुलांचा हार आपल्या हातात घेतला व तो मीराबाईच्या गळ्यात घातला व मीराबाईला गुरु मानून मीराबाईच्या चरणावर साष्टांग दंडवत घालून प्रणाम केला व म्हणाला की, हे गुरुमाते! सात दिवसांपूर्वी आपल्या हाताने माळ घालावी अशी माझी इच्छा होती. आताही ती आहे. परंतु आता फुलाची नव्हे तर तुळशीची माळ देऊन मंत्र द्या व या भवसागरातून माझा उद्धार करा. हा आहे अनुष्ठानाचा ध्यानाचा प्रभाव! सात दिवसांपूर्वा ज्याच्या मनात विकार होता तो शांत झाला. विकारी दृष्टी पवित्र झाली. जिला पत्नी बनवू पाहत होता तिलाच गुरुमाता म्हणून पहावयास लागला.

अशा कितीतरी कथा सांगता येतील ज्या भूतकाळात घडून गेलेल्या आहे. परंतु अनुष्ठानाचा प्रत्यक्ष प्रभाव तर अनेक ठिकाणी पाहावयास आजही मिळतो. कित्येक व्यसनाधिन व्यक्ती निर्व्यसनी झालेले आहे. कित्येकांचे संसार व्यसनाने विकाराने बरबाद झाले होते, ते आज सुखा-समाधानाने जीवन जगत आहे व आपण तरूण इतरांना तारण्यास समर्थ झालेले आहे.

म्हणून संत बहेणाबाई म्हणते की, स्नान, संध्या, जप, अनुष्ठान नित्य केले पाहिजे. त्याच प्रमाणे..

**फलाशा सोडूनी न अहं कर्तव्यता । मोक्ष तो आइता तेथे असे ।।**

कसल्याही प्रकारची अपेक्षा न ठेवता कर्तव्य कर्म केले पाहिजे. जसे अर्जुनाला निमित्त करून भगवान श्रीकृष्ण देखील म्हणतात...



**कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन**

तुला फक्त कर्म करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे फळाची इच्छा न ठेवता कर्म करीत राहिले पाहिजे.

मी करतो, माझ्यामुळे कार्य होते अशी भावना चुकून देखील मनात आणू नये. '' तुच करता आणि तूच करविता शरण तुला रे भगवंता '' ही भावना नेहमी मनात बाळगली पाहिजे. मी करतो अशी भावना मनात ठेवली तर सहज होणारे कार्य देखील होत नाही व तूच कर्ता आणि तूच करविता अशी भावना मनात ठेवून कार्य केले तर न होणारे कार्य देखील सहज होऊन जाते असा अनुभव आहे. हे सर्व सागायचे तात्पर्य हेच आहे की, आपला प्राण गेला तरी काही हरकत नाही, परंतु स्नान, संध्या, जप, अनुष्ठान नित्य करतो आणि कसल्याही फळाची अपेक्षा न ठेवता कर्तव्य कर्म करतो त्याच प्रमाणे मी करतो असा अभिमान मनात न येऊ देता भगवंतच करता आहे व करविता आहे अशी भावना नेहमी मनात बाळगतो तर तो या संसार बंधनापासून मुक्त होतो. म्हणून आता सांगितलेले कार्य करून संसार बंधनापासून मुक्त झाले पाहिजे व मुक्त होता नाहीच आले तर कमीत-कमी आपली अधोगती तरी होऊ नये. आपली अधोगती होऊ नये असे वाटत असेल तर त्यासाठी काय केले पाहिजे?

या साठी संत बहेनाबाई अभंगाच्या पुढील दोन चरणामध्ये म्हणते...

**स्वधर्माचरण आपूलाले वर्ण । यज्ञ आणि दान करी सर्व ।।**
**बहेनीम्हणे ऐसा साधील तो जरी । सत्त्व तो अंतरी प्रवेशेल ।।**

आपापल्या वर्ण आश्रम धर्माचे पालन केले पाहिजे. चार वर्ण व चार आश्रम आहे. ज्या वर्णाला व ज्या आश्रमाला जे कार्य सांगितलेले असेल ते सर्व कार्य यथासांग केले पाहिजे. त्याच प्रमाणे " यज्ञ आणि दान करी सर्व " म्हणजेच जेवढे यज्ञ व दान असेल तेवढे यथाशक्ती केले पाहिजे.

अनेक प्रकारचे यज्ञ सांगितलेले आहे. जसे ईश्वर अर्पण बुद्धीने लोकांच्या सेवेमध्ये द्रव्य खर्च करणे द्रव्य यज्ञ आहे. स्वधर्मपालनरूप तप, यज्ञ, आष्टांगयोगाच्या आचरणाने योग, यज्ञ, भगवंताच्या नामाचा जप करणे जप यज्ञ, भगवत् प्राप्ती विषयक शास्त्रांचे अध्ययन, अध्यापन ज्ञान, यज्ञ आहे.

त्याचप्रमाणे ब्रह्मयज्ञ, देवयज्ञ, पितृयज्ञ, अतिथीयज्ञ, भूतयज्ञ असे हे पंचमहायज्ञ देखील सांगितलेले आहे. हे सर्व यज्ञ केले पाहिजे.

जसे सर्व यज्ञ केले पाहिजे त्याच प्रमाणे सर्व दाने यथाशक्ती केले पाहिजे. अनेक प्रकारचे दान आहे. जसे भूदान, गोदान, अन्नदान, पाणीदान, प्राणदान, रक्तदान, तीलदान, स्वर्णदान नाहीच काही करता आले तर " जो करील श्रमदान त्यासी घडेल चारीधाम " असे कितीतरी दान सांगितलेली आहेत. ती सर्व दाने केलीच पाहिजे.

ही सर्व दाने व यज्ञे केल्यानंतर त्याचे फळ काय मिळेल तर संत बहेनाबाई अभंगाच्या शेवटच्या चरणामध्ये म्हणते...

**बहेनीम्हणे ऐसा साधिल तो जरी । सत्त्व तो अंतरी प्रवेशेल ।।**

हे सर्व दाने व यज्ञे केल्यानंतर आपल्या अंतःकरणात सत्त्वगुणाचा विकास होईल. सत्त्वगुणाचा विकास का झाला पाहिजे



याचे कारण संत तुकाराम महाराज सांगतात..

**रजतमसत्त्व आहे ज्याचे अंगी । याच गुणी जगी वाया गेला ।।**
**तम म्हणजे काय नर्कची केवळ । रज तो सबळ माया जाळ ।।**
**तुका म्हणे येथे सत्त्वाचे सामर्थ्य । करावा परमार्थ अहर्निशी ।।**

रजोगुण, तमोगुण व सत्त्वगुण ज्यांच्या अंगामध्ये असेल तर या त्रिगुणाने जीव अधोगतीला जातो. त्यातल्या त्यात " तम म्हणजे काय नर्कची केवळ " ज्याच्या शरीरामध्ये जास्त तमोगुण असेल तो जीवंतपणी नरकाचे दुःख भोगतो व मृत्यूनंतर नरकाला जातो. रजोगुणी देखील चांगला नाही, कारण तो जीवाला मायाजाळामध्ये अडकवतो. सत्त्वगुण मात्र ठीक आहे कारण सत्त्वगुणामुळे परमार्थ होतो. म्हणून आपल्यामध्ये सत्त्वगुण आला पाहिजे की, जेणे करून परमार्थ घडेल.

म्हणून बहेनाबाई म्हणते जो सर्व प्रकारचे यज्ञे व दान करतो त्यांच्या अंगामध्ये सत्त्वगुण प्रविष्ट होतो व सत्त्वगुणाच्या वृद्धीमुळे तो परमार्थ करून संसारसागरापासून मुक्त होतो.
समर्थ रामदास स्वामी देखील म्हणतात...

**मुळी देह त्रिगुणाचा । सत्त्वरजतमाचा ।**
**त्यामध्ये सत्त्वाचा । उत्तमगुण ।।**
**सत्त्वगुणे भगवद्भक्ती । रजोगुणे पुनरावृत्ती ।**
**तमोगुणे अधोगती। पावती प्राणी ।।**

देह त्रिगुणापासून बनलेला आहे. त्या त्रिगुणापैकी सत्त्वगुण चांगला आहे. कारण त्यामुळे भगवंताची भक्ती घडते रजोगुणामुळे जन्ममृत्यूच्या चक्रात जीव भ्रमण करत राहतो व तमोगुणामुळे

जीवाची अधोगती होते.

संत ज्ञानेश्वर महाराज देखील म्हणतात...

**रजापासूनिया जाहली उत्पत्ती । सत्त्वगुणी स्थिती वाढविली ।।**
**तमोगुणे करूनी पाविजे मरण । राहटती त्रिगुण जगामाजी ।।**

रजोगुणापासून जीवाची उत्पत्ती होते. सत्त्वगुणामुळे जीवाची स्थिती वाढते व तमोगुणाने मरण होते अशा प्रकारे तीन गुण नेहमी उत्पत्ती, स्थिती व लय करत राहतात. म्हणजेच संसारचक्र त्रिगुणाने चालते.

भगवान श्रीकृष्ण गितेमध्ये म्हणतात...

**उर्ध्व गच्छन्ति सत्त्वस्था मध्ये तिष्ठती राजसाः ।**
**जघन्यगुणवृत्तीस्था अधो गच्छन्ति तामसाः ।।**

सत्त्वगुणामध्ये स्थित जीव स्वर्गादि उंच लोकाला जातो. रजोगुणामध्ये स्थित राजस जीव मध्ये अर्थात मानव लोकामध्ये राहतो. परंतु तमोगुणामध्ये निमग्न तामसी जीव जंतू रूपाने अर्थात निच गतीला जातो.

संत एकनाथ महाराज देखील एकनाथी भागवतामध्ये म्हणतात.

**सत्त्वे निमाल्या सात्त्वीक । ते पावती स्वर्गलोक ।**
**रजोगुणे निमाल्या देख । त्या मनुष्य लोक मानवा ।।**
**अंती वाढोणी तमाधिक्य । तमोगुणे निमाल्या देख ।**
**ते भोगिती महानरक । दुःख दायक दारूण ।।**

ज्या जीवामध्ये सत्त्वगुण असेल तो सत्त्वगुणी व्यक्ती मृत्यू पावल्यानंतर स्वर्गलोकामध्ये जावून सुख भोगतो. रजोगुणी व्यक्ती मृत्यू पावल्यानंतर तो याच लोकामध्ये परत जन्म घेतो. परंतु ज्यामध्ये



तमोगुण असेल तो मात्र मेल्यानंतर महानरकात जाऊन दुःख ही दुःख भोगतो.

या सर्व संतांच्या व भगवंताच्या विचारानुसार हे सिद्ध होते की, प्रत्येक व्यक्तीमध्ये म्हणजेच जीवामध्ये मग तो स्त्री असेल किंवा पुरुष असेल त्या प्रत्येकामध्ये कमी अधिक प्रमाणात तीन गुण असतात. परंतु ते तिन गुण प्रत्येकामध्ये सम प्रमाणात नसतात तर विषम प्रमाणात असतात. कुणात सत्त्वगुण तर कुणात रजोगुण तर कुणात तमोगुण विशेष प्रमाणात असतो. ज्यामध्ये जो गुण जास्त असतो त्या गुणाचा तो जीव समजला जातो. जसे तमोगुणी, सत्त्वगुणी अथवा रजोगुणी आणि जसा तो जीव असेल त्या प्रमाणे त्याची सद्गती किंवा दुर्गती होते.

म्हणजेच सत्त्वगुणी स्वर्गादि चांगल्या लोकात जातो. रजोगुणी याच लोकात मृत्यूनंतर जन्मधारण करतो तर तमोगुणी मृत्यूनंतर महान नरकात जातो. म्हणून सत्त्वगुणी बनून आपणास स्वर्गादि शुभलोकात नाहीच जाता आले तर कमीत कमी आपल्यामध्ये तमोगुणी लक्षण घेऊन महान नरकात तरी जाऊ नये.

म्हणून महान नरकात जे जातात अशा तमोगुणी जीवाचे काय लक्षणे आहे हे आपण चांगले समजून घेतले पाहिजे व आपल्यामध्ये हे तमोगुणाचे लक्षणे असेल तर ते निवृत्त केले पाहिजे व ज्यांच्यामध्ये तमोगुणाचे लक्षणे आहे त्यांची संगती टाळली पाहिजे अन्यथा जित्यापणी दुःख व मेल्यानंतर महानरक आपणास भोगावाच लागेल. म्हणून तमोगुणाचे लक्षणे अगोदर समजून घेतले पाहिजे व तमोगुणी लक्षणे आपल्यामधून निवृत्त

केले पाहिजे.

संत बहेणाबाई दुसऱ्या एका अभंगामध्ये तमोगुणी जीवांचे लक्षणे सांगताना म्हणते....

**विधीहीन वर्ते वेदासी न मानी । श्रेष्ठ अव्हेरुनी वर्ततसे ।।**
**तया दुर्जनासी नर्कयोनी जन्म । मानावा अधम तमोगुणी ।।**

जो वेदाला, विधीला, शास्त्राला मानत नाही तो तमोगुणी आहे. जसे शास्त्राने किंवा वेदाने सांगितले की, मातृदेवभव, पितृदेवभव, आचार्यदेवभव, माता, पिता, गुरु देवासमान आहे. त्यामुळे त्यांची आज्ञा पाळली पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे. परंतु तमोगुणी जीव आईला, वडिलांना, गुरुंना मानत नाही. त्यांची आज्ञा पालन करत नाही व त्यांची सेवाही करत नाही. ऐवढेच नव्हे तर '' श्रेष्ठ अव्हेरुनी वर्ततसे '' आपल्यापेक्षा वयाने, ज्ञानाने, अनुभवाने जे मोठे असतील तर त्यांचे आचार विचार, श्रवण केले पाहिजे, ते जीवनात पाळले पाहिजे. परंतु तमोगुणी जीव आपल्यापेक्षा जे वयाने, ज्ञानाने, अनुभवाने मोठे आहे अशांचेच काय परंतु साधूसंतांचे ऐवढेच नव्हेतर भगवंताचे देखील ऐकत नाही व त्यांचे विचार मानत नाही. जसे संतांनीच काय परंतु साक्षात भगवंताने दुर्योधनाला, रावनाला समजावून सांगितले परंतु त्यांनी ते मानले नाही व शेवटी आपल्या सर्व कुळासह मरावे लागले. म्हणून तमोगुणी जीवांची अशीच दुर्दशा होते. असे तमोगुणी जीव जीवंतपणी दुःख भोगतात व मृत्यूनंतर संत बहेणाबाई म्हणते त्या प्रमाणे '' तया दुर्जनासी नर्कयोनी जन्म '' घ्यावा लागतो. म्हणजेच असा अधम जीव नरकामध्ये जातो.

तमोगुणी जीव नर्काचे दुःख भोगल्यानंतर अधम गतीला



जातो. म्हणून आपली अधम गती होऊ नये यासाठी संत बहेणाबाई परत अजून तमोगुणी जीवांचे लक्षणे सांगते.

**अखाद्य भक्षण अचोष्य चोषण । अपेयाचे पान सुखे जया ।।**
**बहेणी म्हणे ऐसा जाणा तमोगुणी । पडेल पतनी हिन याती ।।**

'' बहेणी म्हणे ऐसा जाना तमोगुणी '' माना असे न म्हणता संत बहेणाबाई म्हणते की, ' जाना ' कारण मानल्यानंतर परत संभ्रम किंवा शंका निर्माण होऊ शकते. परंतु जाणल्यानंतर कुठल्याच प्रकारची शंका निर्माण होऊ शकत नाही. म्हणून बहेणाबाई म्हणते की, आपण जाणा काय जाणा, तर तमोगुणी कसा असतो हे आपण प्रत्यक्ष जाणा. तमोगुणी जीव हीन योनीमध्ये पडतो. हिन योनी कोनत्या? तर महापुरुष सांगतात की, श्वान सुकराची योनी हिन योनी असते.

श्वान म्हणजे कुत्रे आणि सुकर म्हणजे डुक्कर. मृत्यूनंतर यमपुरीचे दुःख भोगल्यानंतर कुत्र आणि डुक्कर होऊ नये, असे वाटत असेल तर त्यासाठी तमोगुणाचे लक्षणे आपल्या मध्ये नसावे. संत बहेणाबाई म्हणते की श्वान सुकाराच्या गतीला कोण जातो? तर जो '' अखाद्य भक्षण अचोष्य चोषण । अपेयाचे पान सुखे जया '' या तीन गोष्टींपैकी एखादी गोष्ट जीवनात करतो. **पहिली गोष्ट म्हणजे अखाद्य भक्षण -** म्हणजेच जे खाऊ नये ते खातो. खाऊ नये खातो म्हणजे नेमके काय खातो, तर जो सागुती खातो. सागुती म्हणजे सहा जनांना जी पापामध्ये गुंतविते तिला म्हणतात सागुती. आपण म्हणाल की ते सहा कोण आहे की ज्या सहा जनांना पापाचा वाटा घ्यावा लागतो. तर महापुरुष

सांगतात, अनुमोदन देणाऱ्याचा पहिला नंबर आहे. नरकात जाण्याची पाळी येते तेव्हा अनुमोदन देणाऱ्याचा पहिला नंबर असतो. जसे जो म्हणतो की, मारल्याने, कापल्याने, खाण्याने काय होते, फक्त शिजवल्याने अथवा वाढल्याने काय होते, तर असे अनुमोदन देणाऱ्याचा पहिला नंबर पापाचे दुःख भोगण्यासाठी लागतो. आपली करगंळी कापल्यानंतर आपणास कळेल की, कापल्याने काय होते. मारणाऱ्याचा म्हणजेच कापणाऱ्याचा दुसरा नंबर आहे. घरी आनणाऱ्याचा तिसरा नंबर आहे. अजून तीन राहिले ऐकायचे आहे? ऐकूणच घ्या. शिजविणारा किंवा शिजवणारी वाढणारा किंवा वाढणारी आणि खाणारा किंवा खानारी. या सहा जनांना पापामध्ये जी गुंतविते तिला म्हणतात सागुती! बऱ्याचशा स्त्रीया हळूच आवाजात म्हणतात बाई ! मी काहीच करत नाही फक्त बनवून देते.

अशा प्रकारे आपण केवळ बनवून दिले तरी एक पापाचा वाटा आपणास भोगावाच लागेल. म्हणून बऱ्याच माता माउल्यांनी हे ऐकले व दृढ निश्चय केला की, आता बिलकूल बनवायचे देखील नाही. बऱ्याचशा माता, माऊल्या विचारतात की, आपण म्हणता की, बनविले तरी पाप लागते. तेव्हा आमची बनविण्याची देखील इच्छा नाही. परंतु आमच्या घरचे पुरुष तर राक्षसी वृत्तीचे आहे. त्यांना खाल्ल्या पिल्ल्या शिवाय होत नाही व बनवून दिले नाही तर ते आम्हास मारतात, तेव्हा काय करावे? याचे उत्तर तर हेच आहे की, मारले तर मार खाऊन घ्या. परंतु एक पापाचा वाटा घेऊ नका. कारण या ठिकाणी कुणीतरी आपल्याला पतीच्या मारापासून सोडविल. परंतु तेथे यमुपरीमध्ये कुणी सोडवायला येणार नाही व यमाचा मार



आपल्याकडून सहनही होनार नाही. हे ऐकून अनेक माता माऊल्यांनी पापाचा एक देखील वाटा घ्यायचा नाही असे ठरविले. कारण जो जीव असा पापाचा वाटा घेतो त्याला यमपुरीमध्ये जावे लागते व जो सागुती खातो, तो श्वान सुकराच्या गतीला जातो. तमोगुणाचे अजून  दुसरे लक्षणे म्हणजे...

**अचोष्यचोषण -** जो चोखू नये ते चोखतो तो तमगुणी असतो. जसे काही तंबाखू आदि खातात चोखतात. त्यामुळे नरकाचे दुःख भोगतील त्या वेळेस भोगतील. परंतु काहीतर कॅन्सरसारख्या महाभयानक रोगाने पिडीत होऊन जीवंतपणीच नरकाचे दुःख भोगत राहतात. तंबाखूच्या सेवनाने गळयाला किंवा पोटाला छिद्र पडते व त्यामुळे खाल्लेला कोणताही पदार्थ पोटात थांबत नाही व मृत्यूशिवाय काहीही त्याला पर्याय राहत नाही. अजून तमोगुणाचे लक्षण म्हणजे...

**अपेयाचे पान सुखे जया -** जे पिऊ नये तो पितो म्हणजेच दारू म्हणजेच मद्य जो पितो त्याची तर अगदीच महाभयानक दुर्दशा होते. जसे भगवंत किंवा ज्ञानेश्वर महाराज म्हणतात...

**प्रत्यक्ष पाहे पा विरा । जो सावध घे मदिरा ।**
**तो होऊनी ठाके माजीरा । तयेची क्षणी ।।**

प्रत्यक्ष पहा म्हणजे आपण प्रत्यक्ष पिऊन पहा असे नाही तर जो पितो म्हणजेच जो मदिरा म्हणजेच दारू पितो त्याची अवस्था आपण प्रत्यक्ष आपल्या डोळयाने पहा. पिण्यापूर्वी त्याची अवस्था चांगली असते. परंतु पिल्यानंतर "तो होऊनी ठाके माजिरा तयेची क्षणी" अशी त्याची अवस्था होते. मद्य पिल्यानंतर लोक

म्हणतात त्याला आता ‘‘ माज ’’ चढला. म्हणजेच मद्य पिल्यानंतर त्याला आई, बहीण, मुलगी, पत्नी यातील काही भेद कळत नाही. त्यामुळे बऱ्याच वेळेस करू नये ते देखील तो कुकर्म करतो व जाऊ नये अशा नरकाला तो जातो. मद्य पिणाऱ्याची बुद्धी किती भ्रष्ट होते हे जाणून घेण्यासाठी एक बातमी वर्तमानपत्रामध्ये आली होती. ती आपण कदाचित वाचली असेल नसेल. वाचली नसेल तर ऐका. खर म्हणजे ती बातमी येथे स्टेजवर सांगणे चांगली वाटत नाही. तरी परंतु आपल्याला काही बोध होण्यासाठी ती बातमी सांगण्याचा मोह आवरत नाही. ती बातमी ऐकणे आपल्याला चांगले वाटणार नाही. परंतु आपल्या हितासाठी ती सांगणेही अत्यावश्यक आहे असे वाटते.

एक माता पोलीस स्टेशन मध्ये गेली व त्या ठिकाणी पोलिसांना विनंती करायला लागली की, साहेब काहीही करा परंतु माझ्या मुलाला जेल मध्ये टाका. खर म्हणजे आई मुलाला जेल मधून सोडविण्यासाठी स्वतः जेलमध्ये जाण्यास तयार असते. परंतु ही आई मुलाला जेलमध्ये टाकण्याचे का म्हणते आहे, असा प्रश्न पोलिसांना पडला? तेव्हा त्या पोलिसाने विचारले मुलाला जेलमध्ये कशासाठी कोंडायचे त्याने काय केले? त्या वेळेस ती माता रडत रडत म्हणाली की माझ्या मुलाने माझ्यावर बलत्कार केला. ज्या वेळेस पोलिसांनी त्या मुलाला पकडून आणले व विचारले की, असे अधम कुकर्म तू कसे काय केले? त्या वेळेस तो मुलगा म्हणाला की, दारूच्या नशेत मला काहीच कळाले नाही की, मी काय केले?

ही बातमी ऐकूण आपणास निश्चीतच चांगले वाटणार नाही. ही केवळ एकच बातमी आहे, असे नव्हे तर बऱ्याच माता भगिणी



आमच्याकडे ग्राऱ्हाणे मांडत असतात की, बाबाजी माझा मुलगा, भाऊ, दीर, सासरा नेहमी असे... करतो आता मी काय करू? सर्वच पोलीस स्टेशनमध्ये जातात असे नाही. यावरून मद्य पिणारा श्वान, सुकराच्या गतीला नाही जानार तर कोणत्या गतीला जाईल? अशीच बातमी आपल्या संदर्भात येऊ नये अशी तक्रार आपल्या संदर्भात आपली आई, बहीण, मुलगी करू नये असे वाटत असेल तर आत्ताच सावध झाले पाहिजे! नरकाचा मार्ग जो तमोगूण तो सोडला पाहिजे. कारण तमोगुणीचे निश्चीत अधःपतन होते.

आजच्या युगामध्ये अनेक तरुणांचे अशा प्रकारे अधःपतन होत आहे. ‘‘ बलसागर भारत होवो विश्वात शोभूनी राहो ’’ असे गीत या देशात गायीले जात असले तरी अनेक तरुण या व्यसनामुळे निर्बल झालेले आहे व होत आहे.

व्यसनांच्या अती सेवनामुळे तर काही तरुण मुलांमध्ये खरी तारुण्य अवस्था प्राप्त होण्यापूर्विच म्हतारपणाची अवस्था निर्माण होत आहे.

बरेचसे तरुण आमच्याकडे येतात व विचारतात की, बाबाजी घरचे माझ्या लग्नाचा विचार करत आहे, परंतु माझी लग्न करण्याची इच्छा नाही. ज्या वेळेस त्यांना लग्न करण्याची इच्छा नसल्याचे कारण विचारले त्या वेळेस बऱ्याच जनांनी सांगितले की, मी अती व्यसन केले त्यामुळे मी आता माणसात राहिलो नाही. तेव्हा आता लग्न करून काय उपयोग. अशा प्रकारे तरुण पिढीचे जीवन बरबाद होत आहे.

त्या तरुण पिढीला अधःपतनापासून वाचविण्यासाठी हे

गावोगावी अनुष्ठान चालू आहे. त्याचप्रमाणे बाल वयात संस्कार मिळावे यासाठी भांगसी मातेच्या गडाजवळ गुरुकूल सुरू करण्यात आलेले आहे. उद्देश हा आहे की, व्यसनामुळे म्हणजेच तमोगुणामुळे जे अधःपतन होते, त्यापासून समाज परावृत्त झाला पाहिजे.

तमोगुणाचे लक्षणे समर्थ रामदास स्वामी देखील सांगतात.

**नावडे भक्ती नावडे भाव । नावडे तीर्थ नावडे देव ।**
**वेदशास्त्र न लागे सर्व । तो तमोगुण ।।**

ज्याला भक्ती आवडत नाही म्हणजेच जो कधी भक्ती करत नाही, तो तमोगुणी आहे. तमोगुणी जो असतो त्याचा ईश्वरावर, सद्ग्रंथावर, साधूसंतांवर, सद्गुरुवर विश्वास नसतो. म्हणजेच त्याच्या मनात या सर्वांबद्दल सद्भाव नसतो. भावना नसल्यामुळे त्याला तीर्थ देवता आवडत नाही. वेदशास्त्र तो कधी पाहत नाही. म्हणजेच वेदा, प्रमाणेशास्त्रा प्रमाणे जो वागत नाही तो तमोगुणी असतो. अजून तमोगुणीचे लक्षणे सांगतात...

**स्नान संध्या नेम नसे । स्वधर्मी भ्रष्टला दिसे ।**
**अकर्तव्य करितसे । तो तमोगुण ।।**

जो तमोगुणी असतो तो नियमाने स्नान, संध्या करीत नाही. स्वधर्माने वागत नाही. जे करू नये नेमके तेच तो शास्त्रविपरीत कर्म करीत राहतो. ऐवढेच नव्हे तर अजून समर्थ म्हणतात...

**देवाची जो निंदा करी । जो आशा बद्ध अघोरी ।**
**जो संत संग न करी । तो तमोगूण ।।**

भगवंताची स्तुती न करता तो भगवंताची निंदा करत राहतो. रात्रंदिवस मनामध्ये अनेक प्रकारच्या आशा अपेक्षा बाळगतो. जे



काय मिळाले पाहिजे ते फक्त मलाच मिळाले पाहिजे अशी अघोरी वृत्ती त्याची असते. संतांची, चांगल्यांची संगती न धरता तो दृष्टाच्या संगतीत राहतो. त्यामुळे वाईट कर्म करून या जगात दुःख व मेल्यानंतर नरकाचे महा दुःख भोगत राहतो. म्हणून असे तमोगुणाचे लक्षणे आपल्याजवळ नसावे.

आता रजोगुणाचे लक्षणे देखील आपण जाणून घेतले पाहिजे. रजोगुणाचे लक्षणे थोडक्यात आपणास समजावे म्हणून संत बहेणाबाई अभंगाच्या द्वारे उदाहरण देऊन सांगतात...

**दुधाचिये चाडे गाईचे सेवन । आंब्याचे पालन फळालागी ।।**
**द्राक्षाचिया मुळा दुधाची घागरी । समर्थाचे घरी आमंत्रणे ।।**
**बहेणीम्हणे ऐसी क्रिया जयापासी । ज्ञान तयापासी नये कदा ।।**

रजोगुणी व्यक्ती जोपर्यंत गाय दूध देते तोपर्यंत तिची सेवा करतो. दूध देणे बंद केले तर तिला कसायाला विकण्यासाठी मागेपुढे पाहत नाही. जी गत गाईची तीच कमी-अधीक गत आपल्या आईची. फळाच्या इच्छेने '' द्राक्षाचिया मुळा दुधाची घागरी '' म्हणजे थोड्या लाभासाठी देखील तो जास्त खर्च करतो. गरिबाला अन्न देणार नाही. परंतु श्रीमंताकडून काही मिळविण्यासाठी त्याच्याकडे निमंत्रण देण्यासाठी चकरा मारतो. थोडक्यात म्हणजे जे कार्य करतो ते निष्काम न करता लाभाच्या इच्छेनेच करत राहतो. त्यामुळे त्याला ज्ञानाची प्राप्ती होत नाही व ज्ञानाची प्राप्ती न झाल्यामुळे तो मुक्त होऊ शकत नाही.

म्हणजेच रजोगुणी व्यक्ती समाजाची, कुटुंबाची एवढेच काय परंतु साधू-संतांची, भगवंताची देखील निष्काम भावनेने

सेवा, भक्ती करत नाही. कारण त्याच्या मनामध्ये नेहमीच स्वार्थ भरलेला असतो कोणतेही कार्य करतांना मला काय मिळेल याचाच तो विचार करतो, जसा दुर्योधन.

भगवान श्रीकृष्ण ज्यावेळेस संधी (समझोता) करण्यासाठी हस्तीनापूरला आले म्हणजेच दुर्योधनाला सागण्यासाठी आले की, दुर्योधना पांडव तुझे भाऊ आहे बारा वर्षाचा वनवास व एक वर्षाचा अज्ञातवास त्यांनी भोगलेला आहे. ते तुझे भाऊ असल्यामुळे अर्धे राज्य त्यांना देणे तुझे कर्तव्य आहे. असा सल्ला देण्यासाठी ज्या वेळेस भगवान श्रीकृष्ण आले त्या वेळेस दुर्योधनाने भगवान श्रीकृष्णाचे भव्य स्वागत केले. उद्देश हा होता की, भगवान श्रीकृष्ण माझ्या मताचे समर्थन करतील. भगवान श्रीकृष्णाला भगवान न मानणाऱ्या दुर्योधनाने जे स्वागत केले, त्यामध्ये भक्तीचा लवलेशही नव्हता,होता तो केवळ स्वार्थ.

त्याच प्रमाणे दुर्योधनाने दुर्वास आदी ऋषींची जी जेवण आदी देऊन सेवा केली त्या सेवेचा उद्देश ऋषी-मुनींची किंवा साधू-संतांची सेवा करणे हा खरा उद्देश नव्हता. जेवण आदी देण्याचा उद्देश हा होता की, आपले अन्न दुर्वास आदी ऋषी खातील त्यामुळे त्यांची बुद्धी आपल्या सारखीच दुष्ट होईल. आपण जे सांगितले त्याप्रमाणे ते रात्री पांडवांकडे जातील, पांडवांना जेवण मागतील पांडव अरण्यात असल्यामुळे ते रात्री जेवण देऊ शकणार नाही त्यामुळे पांडवांनी जेवण दिले नाही तर शाप देऊन त्यांना भस्म करतील. असा दुष्ट उद्देश दुर्वास आदी ऋषींना जेवण देण्याचा दुर्योधनाचा होता.



त्यामुळे भगवतांचे स्वागत करूण संतांना जेवण देऊन दुर्योधन भक्त गणल्या गेला नाही. त्याची भक्ताप्रमाणे सद्‌गतीही झाली नाही. कारण तो रजोगुणी होता जो स्वार्थ भावनेने कार्य करतो तो रजोगुणी असतो त्याची मुक्ती होत नाही. तो जन्म मृत्यूच्या चक्रात नेहमी भ्रमण करत राहतो.

म्हणून रजोगूण जन्ममृत्यूच्या चक्रात गुतंवितो, तमोगूण नरकाला नेतो परंतु चांगला म्हणजे सत्त्वगुण मुक्त करतो. म्हणून शेवटी सत्त्वगुणाचे लक्षण ऐकूण आपल्यामध्ये सत्त्वगुण आला पाहिजे. सत्त्वगुणाचे लक्षणे सांगतांना समर्थ रामदास स्वामी म्हणतात...

**जो परम सुखकारी । जो आनंदाची लहरी ।**
**देऊनिया निवारी । जन्म मृत्यू ।।**

सर्वात मोठे सुख देणारा असेल तर तो सत्त्वगुण आहे. सत्त्वगुणामुळे सुख मिळते. आनंदाच्या लहरीमध्ये जीव दंग होऊन जातो. सुख, आनंद देऊन सत्त्वगुण जन्म-मृत्यूच्या चक्रापासून जीवाला निवृत्त करतो. अजून सत्त्वगुणाचे लक्षणे सांगतात.

**जो अज्ञानाच्या शेवट । जो पुण्याचे मुळपिठ ।**
**जयाचेनि सापडे वाट । परलोकाची ।।**

सत्त्वगुणामुळे अज्ञान निवृत्त होते. ज्ञानाची प्राप्ती होते. पुण्याचा मार्ग सापडतो व त्यामुळे जीव परलोकामध्ये जातो. त्याची सद्‌गती होते. सत्त्वगुणी व्यक्तीचा व्यवहार कसा असतो तर समर्थ म्हणतात...

**ईश्वरी प्रेमा अथिक । प्रपंच संपदी लौकीक ।**
**सदा सन्निध विवेक । तो सत्त्वगुण ।।**

सत्त्वगुणी व्यक्तीचे सर्व प्रेम ईश्वरावर असते. लौकीक व्यवहार दाखविण्यासाठी केवळ तो संसाराचे कार्य करतो. त्याच्या जवळ नेहमी विवेक असतो. म्हणजे सत्य-असत्य, धर्म-अधर्म, पाप-पुण्य, चांगले-वाईट, सज्जन-दुर्जन, सद्गती-दुर्गती याचे त्याला ज्ञान असते.

दानाच्या बाबतीत सत्त्वगुणसंपन्न व्यक्तीचे लक्षणे सांगतांना समर्थ म्हणतात...

**धनदान वस्त्रदान । अन्नदान उदकदान ।**
**करी ब्राह्मण संतर्पन । तो सत्त्वगुण ।।**

धन, वस्त्र, पाणी, अन्न आदि निष्काम भावनेने सत्त्वगुणी व्यक्ती, ब्राह्मणांना, सत्पात्रांना व साधूसंतांना दान करतो. सत्त्वगुणी व्यक्तीचे अतरंग लक्षणे सागतांना समर्थ म्हणतात...

**शांती क्षमा आणि दया । निश्चय उपजे जया ।**
**सत्त्वगुण जाणावा तया । अंतरी आला ।।**

सत्त्वगुणी व्यक्तीमध्ये दया, क्षमा, शांतीचा निवास असतो.

भगवंताच्या सदंर्भात सत्त्वगुणी व्यक्तीच्या अवस्थेचे वर्णन करतांना समर्थ म्हणतात..

**एका भगवंता कारने । सर्व सुख सोडले जेणे ।**
**केले देहाचे सांडणे । तो सत्त्वगुण ।।**

या जगात जेवढे सुख असेल त्या सर्व सुखाला सत्वगुणी तुच्छ मानतो. सर्वात श्रेष्ठ सुख तो भगवंताचे मानतो व ते सुख मिळविण्यासाठी परमात्मा प्राप्तीसाठी देह जावो अथवा राहो याची



त्याला चिंता नसते.

भोजनाच्या संदर्भात सत्त्वगुणी व्यक्तीचे लक्षण सांगतांना समर्थ म्हणतात...

**जेणे जिंकीली रसना । तृप्त जयाची वासना ।**
**जयास नाही कामना । तो सत्त्वगुण ।।**

ज्याने आपली रसना जिंकली असेल ज्याची वासना शांत झाली असेल व ज्यास आता कसलीच कामना उरली नसेल तर तो सत्त्वगुणी समजला जातो. त्यामुळे संतांची त्याच्यावर कृपा होते. संतांच्या कृपेमुळे समर्थ म्हणतात..

**संत कृपा होय जयास । तेणे उद्धरीला वंश ।**
**तो ईश्वराचा अंश । सत्त्वगुणे ।।**

ज्याच्यावरती संतांची कृपा होते तो जणू ईश्वराचा अशंच असतो. त्याच्यामुळे सर्व वंशाचा उद्धार होतो. म्हणून आपला आणि आपल्या बेचाळीस कुळांचाच नव्हे, तर सर्वांचा उद्धार होण्यासाठी सत्त्वगुण अंगी आला पाहिजे व सत्त्वगुण अंगी येण्यासाठी संत बहेणाबाई म्हणते...

**संतांची संगती सद्‌गुरु सेवन । नाही दूजेपण जयामध्ये ।।**
**वैराग्य वर्तत प्रंपचाच्या साक्षी । आलीयाचे रक्षी चित्त जो का ।।**
**बहेणी म्हणे ऐसा स्वर्गा जाय नर । आत्मज्ञान शूर जाय मोक्षा ।।**

ज्यांना संतांची सद्‌गुरुची संगत व सेवा घडली असेल प्रपंचामध्ये ज्याला वैराग्य निर्माण झाले असेल असा व्यक्ती स्वर्गलोकांमध्ये जातो व ज्याला आत्मज्ञान झाले असेल तो मुक्त होतो.

म्हणून जो अशा प्रकारे सहा कर्म यथासांग करतो तो मुक्त होतो व ज्याच्या मध्ये सत्त्वगुण येतो, तो अधोगतीपासून वाचतो. म्हणून या संसार बंधनापासून मुक्त व्हायचे असेल तर त्यासाठी हे सहा कर्म नित्य केले पाहिजे व हे सहा कर्मे होण्यासाठी भगवंताकडे प्रार्थना केली पाहिजे की, हे प्रभू मला संतांची, सद्‌गुरुची सेवा घडू दे व तुझे नाम माझ्या मुखामध्ये रात्रंदिवस असू दे. म्हणून हे प्रभू अशी कृपा कर.

**अब प्रभू कृपा करहू यही भाँती । सब तजी भजन करहू दिन राती ।।**
**जयती शिवा शिव जानकी राम । गौरी शंकर सीता राम ।।**
**जय रघुनंदन जय सीयाराम । ब्रज गोपी प्रिय राधेश्याम ।।**
**रघुपती राघव राजाराम । पतित पावन सीताराम ।।**
**श्रीराम जय राम जय जय राम । जय महारूद्र जय हनुमान ।।**
**विठ्ठल विठ्ठल पंढरीनाथ । जय शिव शंकर भोलेनाथ ।।**
**दुर्गती नाशिनी दुर्गा माँ । काल विनाशिनी काली माँ ।।**
**आदि शक्ती भवानी माँ । भव भय भंगसी भांगसी माँ ।।**

**ॐ नमः पारबती पतये हर हर महादेव**
**गोपाल कृष्ण भगवान की जय**
**श्री गुरूदेव दत्त दत्त दत्त अलख निरंजन**
**सद्‌गुरु जनार्दन स्वामी महाराज की जय**
**महामंडलेश्वर स्वामी परमानंदगिरीजी महाराज की जय**

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖



## स्वामीजींचे जपानुष्ठान काळातील सत्संग - प्रवचन

# पुस्तके, व्ही.सी.डी.

| दिवस | सकाळ | रात्री |
|---|---|---|
| १ ला | जन्म - मृत्यू चक्र निवृत्ती | मायाजाळा पासून मुक्ती |
| २ रा | प्रातःकाळी उठावे | संसार सागरातून मुक्ती |
| ३ रा | नाम जपाची विधी | करावे तसे भरावे |
| ४ था | ध्यानाची विधी | नाम जपाने मुक्ती |
| ५ वा | भोजनाने भक्ती | संत संगतीने मुक्ती |
| ६ वा | असाध्य ते साध्य | दानाने सद्‌गती |
| ७ वा | पाप निवृत्ती उपाय | सद्‌गुरु वचनामृताने मुक्ती |
| ८ वा समाप्तीचा दिवस | प्रवृत्ती निवृत्ती मार्ग | नित्यकर्म - अनुष्ठान महिमा |